**ठळक बातम्या**

- घरगुती वापराचे सिलिंडर ५० रुपयांनी महाग, उद्यापासून उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना ५५० रुपये, तर इतरांना ८५३ रुपये द्यावे लागणार
- अमेरिकेनं वाढवलेल्या करांमुळं जगभरातल्या शेअर बाजारात हाहाकार, सेन्सेक्समध्ये सव्वा २ हजार आणि निफ्टीमध्ये साडे सातशे अंकांची घट
- बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातल्या आरोपीच्या चकमक प्रकरणी पाच पोलिसांविरुद्ध गुन्हे दाखल करण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश

**आणि**

- कोकण, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी येत्या २ दिवसात तपमान वाढण्याची शक्यता

**<><><><><>**

केंद्र सरकारनं घरगुती वापराच्या एलपीजी सिलिंडरची किंमत ५० रुपयांनी वाढवली आहे. उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना उद्यापासून हे सिलिंडर ५५० रुपयांना तर इतरांना ८५३ रुपयांना मिळतील, अशी माहिती पेट्रोलियम मंत्री हरदीपसिंग पुरी यांनी नवी दिल्लीत वार्ताहरांना दिली.

पेट्रोल आणि डिझेलवरचं उत्पादन शुल्क लिटरमागे २ रुपयांनी वाढवण्याचा निर्णयही केंद्र सरकारनं घेतला आहे. पण त्याची झळ सर्वसामान्य नागरिकांना जाणवणार नाही. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किंमती कमी झाल्या आहेत. त्यामुळं पेट्रोलियम कंपन्यांना स्वस्तात कच्चे

तेल मिळते आहे. परिणामी या शुल्कवाढीचा फटका ग्राहकांना जाणवणार नाही, असं पेट्रोलियम मंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर घसरल्याचा फायदा सर्वसामान्य जनतेला करुन द्या, पेट्रोल-डिझेलवरचे कर कमी करुन पेट्रोल ५१ रुपये आणि डिझेल ४१ रुपये प्रति लिटरनं द्या, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत केली. संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या काळात पेट्रोलवर प्रति लिटर साडे ९ रुपये आणि डिझेलवर साडे ३ रुपये उत्पादन शुल्क होतं, राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारनं हा दर वाढवून लिटरमागे ३२ रुपये केल्याचा दावा त्यांनी केला.

डॉ. मनमोहनसिंह प्रधानमंत्री असताना कच्च्या तेलाचे दर १४५ डॉलर प्रति बॅरलवर होते. त्याकाळात पेट्रोल ७० रुपये लिटर, तर डिझेल ४५ रुपये लिटर होते, याकडे त्यांनी लक्ष वेधलं.

**<><><><><>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी विविध देशांवर लादलेल्या करांमुळे जगभरातल्या शेअर बाजारांसह भारतीय बाजारातही आज हाहाकार माजला. गेल्यावर्षी लोकसभा निवडणुकीचे निकाल लागले त्यादिवसानंतरची सर्वात मोठी घसरण आज देशातल्या शेअर बाजारांनी नोंदवली. यामुळे देशातल्या गुंतवणूकदारांचं साडे १३ लाख कोटी रुपयांचं नुकसान झालं.

दिवसअखेर मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स २ हजार २२७ अंकांनी घसरुन ७३ हजार १३८ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ७४३

अंकांची घट नोंदवून २२ हजार १६२ अंकांवर स्थिरावला. सत्रादरम्यान सेन्सेक्स सुमारे ४ हजार आणि निफ्टी सुमारे बाराशे अंकांनी घसरला होता. त्यामुळं सेन्सेक्स ७२ हजारांच्या खाली, तर निफ्टी २२ हजारांच्या खाली गेला होता. या घसरणीचा सर्वाधिक फटका धातू आणि बांधकाम क्षेत्रातल्या कंपन्यांना जाणवला. माहिती तंत्रज्ञान, बँका, वाहन उद्योग, वित्तीय सेवा क्षेत्रातल्या कंपन्यांचे समभागही आज मोठ्या प्रमाणात घसरले. रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीची बैठक आजपासून मुंबईत सुरू झाली. बुधवारी या बैठकीतले निर्णय जाहीर होतील, त्याकडे शेअर बाजाराचं लक्ष असल्याचं विश्लेषकांनी सांगितलं. जगभरातले इतर शेअर बाजारही आज मोठ्या प्रमाणात घसरले आहेत. अमेरिका, युरोप, जपान, आशियामधल्या निर्देशांकांमध्ये ४ ते ७ टक्के घट दिसून आली.

**<><><><>**

दिव्यांगांच्या सर्वांगीण विकासाकरता नवनवीन योजना आणि धोरणं आखण्याचे, तसंच त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज संबंधित विभागांना दिले. दिव्यांगांच्या विविध समस्यांबाबत मुंबईत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.

**<><><><>**

सायबर गुन्हेगारी रोखणं हे सर्वात मोठं आव्हान असून हे आव्हान पेलण्यासाठी मुंबई पोलीस दल सज्ज आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज व्यक्त केला. मुंबई पोलीस दलाच्या विविध उपक्रमांचं लोकार्पण आज फडनवीस यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. मुंबईत ३ नव्या सायबर प्रयोगशाळांचं उद्घाटन त्यांनी केलं. या प्रयोगशाळांच्या

माध्यमातून सायबरच्या माध्यमातून महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचे गुन्हे कमी कालावधीत सिद्ध करता येणार आहेत.

मुंबईतल्या सर्व पोलीस ठाण्यांमधे महिलाकेंद्रित सोयी सुविधा उभारल्या असून पोलीस ठाणी लोकाभिमुख झाल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. ते म्हणाले……

**होल्ड बाईट - मुख्यमंत्री…**

महिलांना पोलिसांविषयी विश्वास वाटावा यासाठी पोलीस ठाण्यांमधे महिला आणि बाल सहाय्यता कक्ष स्थापन केले आहेत, त्यामुळे महिलांना तक्रार नोंदवताना दडपण येणार नाही याची खात्री असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

राज्यात अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी विमा आणि इतर योजनांमधून केंद्र सरकार पैसा पुरवत आहेच, पण आवश्यकतेप्रमाणे राज्य सरकारनं मागणी केली तर अतिरिक्त मदत दिली जाईल, असं केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी आज सांगितलं. ते नंदुरबारमध्ये एका कार्यक्रमात बोलत होते.

**<><><><><>**

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातला आरोपी अक्षय शिंदे याच्या चकमक प्रकरणी पाच पोलिसांविरुद्ध गुन्हे दाखल करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयानं आज दिले. या प्रकरणी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेचे सहआयुक्त लखमी गौतम यांच्या देखरेखीखाली एसआयटी स्थापन करण्याचे आदेशही उच्च न्यायालयानं दिले आहेत. न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि नीला गोखले यांच्या खंडपीठासमोर आज ही सुनावणी झाली. शिंदे याच्या

मृत्युप्रकरणात आरोपी पोलिसांवर गुन्हे दाखल न करण्याच्या राज्य सरकारच्या भूमिकेवरही उच्च न्यायालयानं ताशेरे ओढले आहेत. अक्षय शिंदे याचा २३ सप्टेंबर २०२४ रोजी तळोजा तुरुंगातून कल्याण इथे दुसऱ्या एका प्रकरणात चौकशीसाठी नेताना पोलिसांच्या गोळीबारात मृत्यू झाला होता.

**<><><><><>**

नाशिकमधल्या काळाराम मंदिर विश्वस्त मंडळाच्या अध्यक्षांना काढून टाकून दुसऱ्या अध्यक्षाची नियुक्ती करण्याचे आदेश उच्च न्यायालयानं दिले आहेत. काळाराम मंदिरातल्या पुजाऱ्यांना नैवेद्यासाठी दिली जाणारी रक्कम परत सुरू करण्याची मागणी पुजाऱ्यांनी न्यायालयात केली होती. यासंदर्भात अध्यक्षांनी तडजोडीसाठी बैठक घ्यावी असं न्यायालयाने सूचित केलं होतं. मात्र त्यांनी कार्यवाही केली नसल्याचं न्यायालयाच्या निदर्शनास आल्याने अध्यक्ष बदलण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. तसंच पुजारी वर्गाला प्रलंबित रकमेसह १२ टक्के व्याज दराने रक्कम न्यायालयात जमा करण्याचे आदेश दिले आहेत.

**<><><><><>**

पुण्यातल्या गर्भवतीच्या मृत्यूप्रकरणी राज्य शासनाच्या चौकशी अहवालात दीनानाथ मंगेशकर रुग्णालय दोषी असल्याचं म्हटलं आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी आज वार्ताहर परिषदेत या अहवालाबाबत माहिती दिली. रुग्णालयानं उपचार नाकारल्यामुळे सुमारे साडे पाच तासांनी भिसे यांना नाईलाजानं दुसऱ्या रुग्णालयात दाखल करावं लागलं. रुग्णालयाकडून झालेलं मानसिक खच्चीकरण आणि प्रचंड रक्तस्राव

यांमुळे भिसे यांचा मृत्यू झाल्याचं या अहवालात नमूद असल्याची माहिती चाकणकर यांनी दिली.

दरम्यान, दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचे स्त्रीरोगतज्ञ डॉ. सुश्रुत घैसास यांनी पदाचा राजीनामा दिला आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज साडे ७ वाजता मुंबई इंडियन्स आणि  रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात सामना होणार आहे. मुंबईतल्या वानखेडे मैदानावर होणाऱ्या या सामन्यात मुंबई इंडियन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी हवामान उष्ण आणि वातावरण दमट राहण्याची शक्यता आहे तर याच कालावधीत विदर्भात उष्णतेची लाट येण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. नागपूर आणि अकोला जिल्ह्याला हवामान विभागानं उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट दिला आहे. यवतमाळ आणि जळगाव जिल्ह्यात तुरळक ठिकाणी उद्या उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**